दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

www.lakshamaharashtra.com  lakshamaha.dhule@gmail.com  lakshamaha.nsk@gmail.com  ▶ RNI No.MAHMAR/2019/79184

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ३२ वा ▶ गुरुवार दि. ७ डिसेंबर २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स्, धुळे



धुळे - नागपूर, अमरावती, अकोला
वेळ - १०:३० ते १०:४५ पर्यंत
लग्न समारंभासाठी व शैक्षणिक सहलीकरिता 2x2 आकर्षक बसेस भाडेतत्वावर मिळतील.
2x1 A/C स्लीपर कोच
लगेज व पार्सलची उत्तम व्यवस्था
डेली सर्व्हिस - सांगली, सातारा, कोल्हापूर
वेळ - १०:३० ते १०:४५ पर्यंत
संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### तरुणीच्या खूनप्रकरणी जप्त मोबाइलवरून तपास

**धुळे ।** शहरापासून जवळ असलेल्या नकाणे गावापासून जवळ असलेल्या बालाजी नगरात निकिता पाटील या तरुणीचा घरात शिरून तीक्ष्ण हत्याराने खून झाला होता. त्यानंतर निकिताच्या घरापासूनकाही अंतरावर दुसऱ्या दिवशी सकाळी अनिकेत बोरसेचा मृतदेह सापडला होता. अनिकेतने निकिताचा खून केल्यानंतर आत्महत्या केली, असा पोलिसांचा संशय आहे. दोघांच्या मृतदेहाजवळ पोलिसांना मोबाइल सापडला होता. अनिकेतच्या मोबाइलमधील चिठ्ठी पोलिसांना मिळाली आहे.

### 'सेट' परीक्षा ७ एप्रिल रोजी घेण्याचे नियोजन

**धुळे ।** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून राज्यस्तरीय साहाय्यक प्राध्यापक पदासाठी अनिवार्य असलेल्या पात्रता परीक्षा अर्थात सेट परीक्षेची घोषणा करण्यात आली आहे. त्यानुसार ७ एप्रिल २०२४ रोजी सेट परीक्षा पार पडणार आहे. विद्यार्थ्यांना सेट परीक्षा देण्यासाठी इंग्रजी आणि मराठी या दोन भाषांचे पर्याय उपलब्ध असणार आहे. महाराष्ट्र आणि गोवा राज्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून दरवर्षी सहा महिन्यांच्या अंतराने दोन वेळा या परीक्षेचे आयोजन केले जाते. ३२ विषयांसाठी यंदा १७ शहरांतील २६२ केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात येणार आहे.

# धुळ्यातील रस्ते विकासासाठी ६३ कोटींचा निधी

## खा.डॉ.भामरेंच्या पाठपुराव्याला यश

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे लोकसभा मतदार संघाच्या विकासासाठी आतापर्यंत शेकडो कोटींचा निधी खेचून आणणारे खा.डॉ.सुभाष भामरे यांनी आणखी एक मास्टरस्ट्रोक लगावत शासनाकडून तब्बल ६३ कोटींचा निधी आणण्यात यश मिळविले आहे. त्यामुळे शहरातील ८० फुटी रोडसह शहरातील विविध भागांतील ६४ रस्त्यांचे रूप पालटणार आहे. यात धुळे महापालिकेच्याहद्दवाढ क्षेत्रातील प्रभागांचाही समावेश आहे.

यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून खा.डॉ.भामरे यांनी विशेष प्रयत्न चालविले होते. दरम्यान, सदर विकासकामांसाठी निधी मंजुर केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री गिरीष महाजन यांचे खा.डॉ. भामरेंनी आभार मानले आहेत. शासनाकडे सातत्याने सुरु होता पाठपुरावा! याबाबत माहिती देताना खा.डॉ.सुभाष भामरे यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत शासकीय मंजुरी मिळाली आहे. या महाभियानांतर्गत धुळे महापालिका क्षेत्रातीलविविध भागांतील रस्त्यांच्या कामांसाठी राज्य शासनाने ६२ कोटी ७८ लाख रुपयांच्या निधीस मान्यता दिली आहे. या निधीसाठी आपण स्वतः शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. या रस्त्यांच्या कामांना निधी मान्यतेचे पत्र राज्याच्या नगरविकास विभागाने आपल्याला दिले आहे. या कामांसाठी आपल्यासोबतच भाजपाचे धुळे शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी स्थायी समिती सभापती शीतल नवले, माजी महापौर प्रदीप कर्पे यांनीही मंत्रालय स्तरावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री गिरीश महाजनयांच्याकडे पाठपुरावा केला. यात ४० कोटी रुपयांच्या निधीसाठी श्री. अंपळकर, श्री. नवले, तर २२ कोटींतील निधीच्या रस्त्यांसाठी श्री. अंपळकर, श्री. कर्पे यांनी पाठपुरावा केला, अशी माहिती खासदार डॉ. भामरे यांनी दिली. शहरातील विविध रस्त्यांची दुरवस्था झाली होती. याबाबत शहरवासीयांकडून सातत्याने रस्त्यांच्या कामांबाबत मागणी होत होती. या मागण्यांची दखल घेत खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरू केला. यानुसार नागरी भागात मूलभूत पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी तसेच त्यांचा दर्जा वाढविण्यासाठी राबविण्यात येणार्या महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानांतर्गत खा.डॉ. भामरे यांच्या प्रयत्नाने तसेच पाठपुराव्यातून धुळे महापालिकेतर्फे शहरातील रस्ते विकास प्रकल्पाचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आला होता. या कामांना मंजुरी मिळाल्याने जनतेला दिलासा मिळाला आहे.



### ६४ रस्त्यांची कामे मंजूर

**या प्रकल्पास नाशिक येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी तांत्रिक मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीने २० ऑक्टोबर २०२३ ला झालेल्या बैठकीमध्ये समितीने केलेल्या शिफारशीनुसार या रस्ते विकास प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. या अभियानांतर्गत धुळे महापालिका हद्दीसह हद्दवाढ क्षेत्रातील विविध प्रभागांतील तब्बल ६४ रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. यासाठी एकूण ६२ कोटी ७८ लाख रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यातआली आहे. कार्यादेश मिळाल्यापासून १८ महिन्यांत ही कामे पूर्ण करण्याची सूचना करण्यात आली असल्याची माहितीही खा.डॉ.भामरे यांनी दिली.**

# महाराष्ट्रात मराठा शिल्लकच राहणार नाही: छगन भुजबळांचा हल्लाबोल

### कुणबी प्रमाणपत्र घेण्यासाठी दादागिरी सुरू असल्याचा आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

आता कुठलीही गोष्ट करायची अजिबात गरज नाही. सगळेच मराठा समाजाचे लोक कुणबी प्रमाणपत्र घेत आहेत आणि ओबीसींमध्ये येत आहेत. त्यामुळे मराठा समाज महाराष्ट्रात शिल्लकच राहणार नाही, सगळे कुणबीच होणार आहेत. त्यामुळे कोणत्याही उपायाची गरजच पडणार नाही, असे विधान मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

महाराष्ट्रातील सगळे मराठा समाजबांधव जर कुणबीमध्ये समाविष्ट होत आहेत. तर मग क्युरेटिव्ह पिटीशन करा आणि बिल आणा पण बाहेर कोण राहणार आहे. आयोगाचे लोकही राजीनामा देत आहेत. हा ओबीसींचा आयोग राहिलाच नाही हा मराठ्यांचा आयोग झाला आहे, असेही छगन भुजबळ म्हणाले. मनोज जरांगे पाटील माझ्याविरोधात रोज बोलतो कारण त्याशिवाय त्याचं भाषण कुणी ऐकणार नाही. हरिभाऊ राठोड गेल्या अनेक वर्षांपासून ओबीसी समाजात फूट पाडण्याचं काम करत आहेत




असाही आरोप छगन भुजबळ यांनी केला. सद्याच्या घडीला दादागिरीने कुणबी प्रमाणपत्रं दिली जात आहेत. खोटी प्रमाणपत्रं दिली जात आहेत. तसंच पुढेही होणार आहे. यापुढेही जातपडताळणीच्या वेळी हेच होणार आहे. दादागिरी करणार आणि अशीच प्रमाणपत्रं घेतली जाणार आहेत. ओबीसींवर चर्चा घेऊन काय करायचं? आता सगळे मराठा ओबीसी होणार आहेत. त्यासाठी सगळ्या बाजूने प्रयत्न सुरु आहेत. न्यायमूर्ती शिंदे गावांमध्ये फिरून हे करा ते करा सांगत आहेत. सगळेच ओबीसी होणार आहेत. महाराष्ट्रात मराठा शिल्लकच राहणार नाहीत महाराष्ट्रात सगळे कुणबी होणार. मनोज जरांगेला कुणीतरी उंचीवर घेऊन जातं आहे. त्याच्या मनाप्रमाणे गोष्टी घडत आहेत. हेच कारण आहे त्यामागे असाही पलटवार छगन भुजबळ यांनी केला.

# नायगाव खोरे भागात पुन्हा बिबट्या पकडला

**नाशिक । प्रतिनिधी**

नायगाव (ता.सिन्नर) येथील शिवारातील शिंदे वस्तीवर शेळ्या फस्त करणारा बिबट्या पकडण्यात आला आहे. नायगाव खोरे भागात नाशिक पश्चिम वनविभागाच्या बिबट्या शोधा अन् पकडा मोहीमेत सहावा मादी बिबट्या सापडला आहे.



या भागात बिबट्यांचा वावर वाढला आहे. त्यात सातत्याने स्थानिक ग्रामस्थांवर बिबट्याचे हल्ले सुरू आहेत. नायगावला वीज उपकेंद्राच्या मागे शेतकरी गोपाळ शंकर शिंदे यांची शेती वस्ती आहे. तेथे शेतातल्या शेडमध्ये जनावरे बांधली जातात. सोमवारी ता. ४ मध्यरात्री बिबट्याने शेळ्यांवर हल्ला चढवला. त्यात दोन शेळ्या फस्त केल्या. तिसऱ्या शेळीचा कान तोडून बिबट्या पसार झाला. यानंतर सिन्नर वनविभागाला कळविले गेले. त्यामुळे घटनास्थळी दाखल होऊन त्यांनी पंचनामा केला. वनरक्षक संजय गिते यांनी तात्काळ शेळके वस्ती वरून पिंजरा आणून उभारला. बिबट्यासाठी पिंजऱ्यात ज्या शेळीला जखमी केले. ती सावज म्हणून ठेवण्यात आली. शेळ्या फस्त केलेल्या बिबट्याने पुन्हा शिंदे वस्ती गाठली. जखमी केलेले सावज हेरण्याच्या नादात मादी बिबट्या पिंजऱ्यात अडकला. बुधवारी ता. ६ पहाटे बिबट्या सापळ्यात अडकला, असे शेतकरी गोपाळ शिंदे यांनी सांगितले. त्यामुळे सिन्नर वनविभागाच्या पथकाने तात्काळ बिबट्याला रेस्क्यू केले आहे.

# ड्रममध्ये टाकून चार वर्षीय भाच्याला केले ठार

**धुळे । प्रतिनिधी**

चार वर्षीय भाच्याच्या रडण्याचा आवाज सहन न झालेल्या मामाने त्यास ड्रममध्ये टाकुन जीवे ठार मारल्याची घटना काल फिरदोस नगरात घडली.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच चाळीसगावरोड पोलिसांनी आरोपी मामास ताब्यात घेतले आहे. मरीयम बी एजाज हुसेन रा.फिरदोस नगर, धुळे या महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, काल दि.५ डिसेंबर रोजी त्यांचा चार वर्षीय मुलगा अजीब एजाज हुसेन हा भावाचा मुलगा मोहम्मद याचेसोबत खेळत होता. यावेळी मुलगा मोहम्मद याच्या रडण्याचा आवाज सहन न झाल्याने नुरूल अमिन नईम अहमद रा.फिरदोस नगर, धुळे याने मुलाला ड्रममध्ये टाकुन ठार केले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच घटनास्थळावर पोलीसअधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, पोलीस उपविभागीय अधिकारी धुळे शहर विभाग, एलसीबी निरिक्षक दत्तात्रय शिंदे, पोनि धिरज महाजन यांनी काल घटनास्थळावर भेट देवून घटनेची माहिती जाणुन घेतली. या फिर्यादीवरून चाळीसगावरोड पोलीस ठाण्यात नुरूल अहमद याचे विरूध्द चाळीसगावरोड पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३०२ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

# राज्यात आत्मविश्वास गमावलेला विरोधी पक्ष: एकनाथ शिंदेंचा टोला

**मुंबई । प्रतिनिधी**

विरोधकांचा विश्वास न्यायालयावर नाही, पत्रकारांवर नाही, सरकारवर नाही. त्यांच्या बाजूने जे बोलेल तोच त्यांचा अशी ज्यांची मानसिकता आहे. राज्यात आत्मविश्वास गमावलेला विरोधी पक्ष राज्याला आहे, असा घणाघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला ते पत्रकारांशी संवाद साधत होते.

शिंदे म्हणाले की, विदर्भात अधिवेशन असल्यानंतर विदर्भाच्या प्रश्नांवर चर्चा होणे अपेक्षित होते. पण विरोधकांनी त्यांच्या पत्रात उल्लेख केला नाही. सरकारच्या वतीने योजना, प्रकल्प याला न्याय दिला जाईल. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचण्याचे काम आमचे सरकार करत आहे. त्यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. तीन राज्याने दाखवून दिले आहे. तर महाराष्ट्रात देखील



चांगले वातावरण आहे. शासन आपल्या दारीवर देखील टीका विरोधकांनी केली. २ कोटी लोकांना मदत मिळत असेल तर त्याला हे लोक इव्हेंट म्हणत असतील तर म्हणू द्या, पण लाभार्थ्यांना त्यांचा लाभ मिळतोय हे गोष्ट चांगली आहे. पण विरोधकांची हीच पोटदुखी आहे. मराठा समाजाला आरक्षण देणार त्यात कोणतीही भूमिका नाही. त्यासाठी सर्व प्रक्रिया व काम युद्ध पातळीवर सुरु आहे. मी शिवरायांची शपथ देखील घेतली आहे. त्यामुळे भुजबळ व आमच्यात कोणताही वाद नाही. भुजबळांची देखील भूमिका आम्हाला माहिती आहे. असे शिंदे म्हणाले.

# साक्री रोडवरील ३१ हजार भागधारकांकडून १३ कोटी अपेक्षित

### सुधारित कर आकारणी, नोटिसांचे वितरण, हरकती मागवल्या

**धुळे । प्रतिनिधी**

महापालिकेतर्फे हद्दवाढ क्षेत्रासह संपूर्ण शहरात मालमत्तांना सुधारित कर आकारणी केली जात आहे. पहिल्या टप्प्यात हद्दवाढीतील गावे, दुसऱ्या टप्प्यात देवपूर भागात आणि आता तिसऱ्या टप्प्यात साक्री रोड भागासाठी मालमत्तांना सुधारित कर आकारणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

साक्री रोड भागातील बखळसह ३१ हजार ६८२ मालमत्तांसाठी ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे.




सुधारित कर आकारणीत या मालमत्तांमधून १३ कोटींवर उत्पन्न अपेक्षित आहे. त्यासाठी आतापर्यंत ५ हजार ३५५ नोटिसांचे वितरण झाले असूननागरिकांकडून हरकती मागविण्यात आल्या आहेत.

साक्री रोड भागासाठी सुधारित कर आकारणीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी ३१ हजार ६८२ मालमत्ताधारकांच्या भोगवट्यातील इमारती व भूखंडांची तपासणी व करमूल्यांकन करून २०२३- २४ तेभूखंडाचे कर करमूल्यांकन यादी २१ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच २०२७-२८ या पाच वर्षांसाठी इमारत व निर्धारणाकरिता प्रत्येक करदात्यास वैयक्तिक स्तरावर विशेष नोटीस बजावण्यात येत आहे. इमारत, जागेचे, करयोग्य मूल्य अथवा करआकारणी, क्षेत्रफळ तसेच मालकी हक्क आदींबाबत काही हरकत असल्यास संबंधितांनी नोटीस मिळाल्यापासून २१ दिवसांच्या आत हरकत नोंदवायची आहे. मुदतीत लेखी अर्ज हरकत प्राप्त न झाल्यास ही आकारणी मान्य आहे असे गृहीत धरून कर आकारणी प्रस्तावित करण्यात येईल. या हरकतींचे वॉर्डनिहाय वर्गीकरण करण्यात येत आहे.

# रोटरी क्लब धुळे क्रॉस च्या धुळे फेस्टिव्हल ला आजपासून सुरुवात

**धुळे ।** अनेकविध सामाजिक उपक्रमांसाठी सातत्याने अग्रेसर असलेल्या रोटरी क्लब धुळे क्रॉस रोड तर्फे दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी धुळे फेस्टिव्हल या व्यावसायिक व औद्योगिक प्रदर्शनाचे आयोजन मालेगाव रोडवरील गिंदोडिया कंपाऊंड येथे करण्यात आले आहे. गुरुवार दि सात डिसेंबर ते रविवार दि दहा डिसेंबर पर्यंत रोज संध्याकाळी चार ते रात्री दहा दरम्यान हे प्रदर्शन समस्त धुळे करांसाठी खुले असणार आहे. या प्रदर्शनात शॉपींग, खाना खजाना, गेम झोन, नवनवीन व्यावसायिक उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री आदी विविध उपक्रमांचा समावेश आहे. या धुळे फेस्टिव्हल चा औपचारिक शुभारंभ गुरुवारी सायंकाळी रोटरी क्लबचे मा प्रांतपाल, व मान्यवर पदाधिकारी व यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. धुळेकरांनी दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी धुळे फेस्टिव्हल ला आपल्या उपस्थितीने उदंड प्रतिसाद द्यावा असे आवाहन संयोजक रोटरी क्लब ऑफ धुळे क्रॉस अध्यक्ष दिपक अहिरे, सचिव सचिन बोरसे, प्रोजेक्ट चेअरमन मनोज चौधरी व रोटरी क्लब धुळे क्रॉस रोड पदाधिकारी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पालकमंत्र्यांच्या पाठपुराव्याला यश; 'वन भवन' साठी २५ कोटींचा निधी वन मंत्रालयाकडून मंजूर

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक शहरातील सर्व कार्यालय त्या-त्या विभागानुसार एककेंद्री असावे हे धोरण ठेवत नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी कृषी भवन, वन भवन, जिल्हा परिषद यासाठी जागा निश्र्चित केल्या त्यानुसार वन भवनासाठी पालकमंत्र्यांच्या पाठवूराव्याने वनमंत्रालयाकडून २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यामुळे आता जिल्ह्यातील वनवृत्तअंतर्गत येणाऱ्या विविध शाखांचे जिल्हास्तरीय व विभागीय स्तरावरील वेगवेगळे कार्यालय एका छताखाली येणार आहेत.



जिल्ह्यातील वनवृत्तअंतर्गत येणाऱ्या विविध शाखांचे जिल्हास्तरीय व विभागीय स्तरावरील वेगवेगळे कार्यालय एका ठिकाणी असावे ही भूमिका पालकमंत्री भुसे यांची नेहमी राहिली. हे सर्व कार्यालये आता एका छताखाली येण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. १ हेक्टर जागेत वन भवनाची अद्ययावत चार मजली प्रशासकीय इमारत साकारण्यात येणार असून यासाठी वनमंत्रालयाकडून २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती मंत्री भुसे यांनी दिली आहे.

वनविभागाचे कार्यालय एका ठिकाणी नसल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप होताना दिसत होता. मुख्य प्रशासकीय ईमारतीची मागणी मंत्री भुसे यांनी ऑगस्ट मध्ये पत्राद्वारे केली होती. त्या मागणीला सकारात्मक घेत वन मंत्रालयाने मंजुरी दिली आहे.

# शेतकऱ्यांचे दुखःविधान भवनापर्यंत नेणार : पराग पस्टे

### किसान काँग्रेसच्या शेतकरी संवाद यात्रेला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

**धुळे । प्रतिनिधी**




धुळे जिल्हयातील कापूस उत्पादक शेतकर्यांच्या कापसाला भाव नाही,राज्यात पूर्ण दुष्काळ जाहिर नाही,पूर्णपणे कोणालाही पिक विमा मिळाला नाही त्यामुळे संकटात सापडलेल्या शेतकर्यांच्या वेदना आणि दुख विधाभवनापर्यंत नेण्यासाठी शेतकरी संवाद यात्रा काढण्यात आली असल्याचे प्रतिपादन शेतकरी व शेतमजूर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पराग पस्टे यांनी केले. धुळे जिल्हयात आ.कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संवाद यात्रेचे उत्साहात स्वागत करण्यात आले असून संवाद यात्रेला जिल्हयात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आ.नानाभाऊ पटोले यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अंतर्गत महाराष्ट्र प्रदेश किसान व खेत मजदूर काँग्रेसतर्फे नंदुरबार ते नागपूर शेतकरी संवाद यात्रा काढण्यात आली आहे. या शेतकरी संवाद यात्रेचे धुळे जिल्हयात उत्साहात स्वागत करण्यात आले. साक्री तालुक्यातील सिंदबंद,छडवेल कोर्डे,टीटाणे,जैताणे,निजामपूर, बळसाणे,दुसाणे मार्गे धुळे तालुक्यात लामकानी,चिंचवार,मेहेरगाव,निमडाळे,गोंदूर अशी शेतकरी संवाद यात्रा काढण्यात आली. यावेळी ठिकठिकाणी शेतकरी संवाद यात्रेचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भोकर येथील शिवरत्न मंगल कार्यालयात शेतकरी संवाद यात्रेची जाहिर सभा घेण्यात आली. यावेळी सभेत प्रदेश किसान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पराग पष्टे,धुळे जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष शामकांत सनेर,नाशिक जिल्हा काँग्रेस अध्यक्ष डॉ.तुषार शेवाळे,विश्वंभर बाबर यांनी मार्गदर्शन केले.सभेचे प्रास्ताविक डॉ.दरबारसिंग गिरासे यांनी केले तर सुत्रसंचालन डॉ.सदाशिव सुर्यवंशी यांनी केले.आभार जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष के.डी.पाटील यांनी मानले.

शेतकरी संवाद यात्रेत किसान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पराग पस्टे,प्रदेश उपाध्यक्ष उत्तम देसले,ॲड.राम कुर्हाडे,किशोर वानखेडे,संपत वक्ते, बळवंत गावीत,धुळे जिल्हा काँग्रेस अध्यक्ष शाम सनेर,डॉ.तुषार शेवाळे,धुळे जिल्हा किसान काँग्रेस अध्यक्ष शाम भामरे,धुळे तालुका काँग्रेस अध्यक्ष डॉ.दरबारसिंह गिरासे,माजी पं.स.सभापती भगवान गर्दे, बाजार समितीचे संचालक गुलाबराव कोतेकर,उपसभापती योगेश पाटील, गायत्री जयस्वाल,प्रकाश पाटील,राजेंद्र देवरे,डॉ.अनिल भामरे,कपिल जाधव, भानुदास गांगुर्डे,भिका पाटील,संचलाक एन.डी. पाटील,सोमनाथ पाटील, हिरामण पाटील आदी सहभागी झाले होते.

# बिलाडीत तरुण शेतकऱ्याने उचलले टोकाचे पाऊल

**धुळे । प्रतिनिधी**

बिलाडी (ता. धुळे) येथील शेतकरी मयूर प्रकाश पाटील (वय २३) या तरुण शेतकऱ्याने सततच्या नापिकीमुळे आत्महत्या केली. मयूर नियमितप्रमाणे शेतात गेले होते. मात्र, ते घरी न आल्याने घरच्यांनी तपास सुरू केला.



नीलेश पाटील, नितीन पाटील, मनोज शिंदे आदी त्यांना शोधत शेतात गेले असता त्यांना तेथे मयूर मृतावस्थेत पडलेले दिसून आले. त्यांनी तत्काळ धुळे येथील रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मयूर यांना तपासून मृत घोषित केले. शेतात रोगार या कीटकनाशकाची बाटली पडलेली आढळली. मयूर यांनी विषारी रोगार औषध प्राशन करून आपली जीवनयात्रा संपविल्याचे त्यांच्या नातलगांनी सांगितले. घरची परिस्थिती हलाखीची असून, यंदा शेतीतून उत्पन्न येईल या आशेवर असताना तेही आले नाही.

दुसरीकडे शेतीसाठी घेतलेले खासगी व बँकेचे कर्ज कसे फेडायचे, या विवंचनेत मयूर असायचे, त्यातूनच त्यांनी आत्महत्या केल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, बिलाडी येथे मंगळवारी (ता. ५) त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# निकालाचे धडे

कर्नाटकनंतर तेलंगणात काँग्रेसने सत्ता मिळवली असली तरी 'दिल्ली बहुत दूर हैं' हेच आजचे वास्तव. इंडिया आघाडीत काँग्रेसला पहिले स्थान देण्यास आघाडीतील सहकारी तयार नाहीत. मतभेदांमुळे आघाडीची बैठक पुढे ढकलण्याची वेळ आली!

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल राजकीय पटलावर दूरगामी परिणाम घडविणारे आहेत, तसेच ते विरोधकांना आत्मचिंतन करण्यास भाग पाडणारे आहेत. मध्य प्रदेश, राजस्तान आणि छत्तीसगढ या महत्त्वाच्या राज्यांमध्ये भाजपने मिळविलेला दणदणीत विजय इंडिया आघाडीच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह उभा करणारा ठरेल. संभाव्य जागावाटपात आपल्याला महत्त्वाची भूमिका बजावता येईल, असा काँग्रेसचा सूर होता. मात्र, पाच राज्यांतील निकालानंतर आघाडीची समीकरणेच बदलून जातील, असे दिसते. निवडणूक कोणतीही असो, ती संपूर्ण ताकदीनिशी लढवायची, हे भाजपचे तंत्र. याला तोंड देण्यासाठी विरोधी पक्षांकडून जी सज्जता दिसायला हवी त्याचे दर्शन वारंवार पराभव होऊनही दिसायला तयार नाही. राजस्तानात दर पाच वर्षांनी सत्तांतर होतेच, हे कारण पुढे करून काँग्रेसला पराभवाचे समर्थन करता येणार नाही. राजस्तानात भाजप आणि काँग्रेस यांना मिळालेल्या मतांच्या टक्केवारीत दोन टक्क्यांचा फरक आहे; पण काँग्रेसला सत्तर जागांच्या आत रोखण्यात भाजप यशस्वी ठरला. भाजपने ४१.८३ टक्के मते मिळवली, काँग्रेसला ३९.५० टक्के मते मिळाली; पण जागांमधील अंतर पन्नासहून अधिक राहिले.

धाडसी निर्णय

मावळते मुख्यमंत्री अशोक गेहलोत आणि सचिन पायलट यांच्यातील वादाचा फटका बसून काँग्रेसने किमान चौदा जागा गमावल्याचे स्पष्ट झाले आहे. या जागांवर काँग्रेसचे उमेदवार दहा हजार मतांच्या फरकाने पराभूत झाले. सचिन पायलट यांना मुख्यमंत्रिपदापासून दूर ठेवले गेले याचा राग गुर्जर समाजाने भाजपच्या पारड्यात मते देऊन काढला. थोडक्यात राजस्तानात सत्तासमतोलाचे गणित साधण्यात आलेल्या अपयशाची किंमत या निवडणुकीत चुकवावी लागली. भलेही आम्ही एकत्र आहोत, हे गेहलोत आणि पायलट दोघेही भासवत राहिले, तरी मतदारांनी या देखाव्यावर विश्वास ठेवण्यास नकार दिला. गेहलोत विरुद्ध पंतप्रधान मोदी, असे निवडणुकीचे चित्र निर्माण झाले असताना राजस्तान सरकारच्या योजना प्रभावीपणे मतदारांच्या मनावर ठसविण्यात काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाला यश आले नाही. राजस्तानमध्ये भाजपने हिंदुत्वाचे कार्ड खेळले. उत्तर प्रदेशाप्रमाणे राजस्तानात देखील भाजपने अल्पसंख्याक समाजातील उमेदवारास तिकीट दिले नव्हते हे लक्षणीय मानावे लागेल. बाबा बालकनाथ यांच्यासह चार धर्मगुरू भाजपने रिंगणात उतरविले. छत्तीसगढमध्ये भूपेश बघेल सरकारच्या विरोधातील सर्वसामान्य मतदारांचा सूर काँग्रेसला अखेरपर्यंत लक्षात आला नाही. उपमुख्य मंत्री टी.एस. सिंगदेव यांनी भूपेश बघेल यांच्या मार्गात अडथळे आणण्यात धन्यता मानली. काँग्रेससाठी बघेल हाच प्रचारातील मुख्य चेहरा होते. राजस्तान, मध्य प्रदेशाप्रमाणे छतीसगढमध्ये सुद्धा भाजपने मुख्यमंत्री पदाचा चेहरा प्रचारात पुढे आणला नाही. तो निर्णय धाडसी होता, मात्र तीनही राज्यांमध्ये तो निर्णय कमालीचा यशस्वी झाल्याचे दिसते. मध्य प्रदेशात भाजप आणि काँग्रेस यांच्यात अटीतटीची लढत होईल, हा अंदाज सपशेल फोल ठरला. कल्याणकारी योजना, मग भलेही त्या मतपेटी डोळ्यासमोर ठेवून आखल्या असतील आणि खरोखरच लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्यास राजकीय हित साधता येते. शिवराजसिंग चौहान यांनी 'लाडली बहना' यासारख्या योजनांतून ते दाखवून दिले आहे. महिला मतदार अशा योजनांमुळे ठामपणे भाजप सरकारच्या पाठीशी राहिला. जे समाजगट भाजपचे पारंपरिक मतदार मानले जात नाहीत, त्या समाजातील महिलांनी देखील भाजपलाच मतदान केले. भाजपने ४८.५५ टक्के मते मिळवली, तर काँग्रेसला मिळालेल्या मतांची टक्केवारी ४०.४० आहे. हे अंतर मोठे आहे. गुजरात आणि उत्तरप्रदेशाप्रमाणे मध्यप्रदेशही भाजपसाठी बालेकिल्ला आहे हे अधोरेखित झाले. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत भाजपला मध्य प्रदेशात चाळीस जागांचा फायदा झाला. गृहमंत्री नरोत्तम मिश्रा यांच्यासह काही मंत्र्यांचा पराभव भाजपसाठी अनपेक्षित म्हणावा लागेल. दोन्ही लोकसभा निवडणुकांमध्ये मोदींकडे पाहून भाजपला मतदान झाले, त्याचीच पुनरावृत्ती राजस्तान, मध्य प्रदेश आणि छतीसगढमध्ये झाली आहे.

# सोळा राज्यांत भाजपाची सत्ता



पाच राज्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकींचे निकाल जाहीर झाले आणि देशातील आता सोळा राज्यांत भाजपा सत्तेवर आल्याचे स्पष्ट झाले. काँग्रेसची सत्ता केवळ पाच राज्यांपुरती उरली आहे. देशात बारा राज्यांत भाजपाची स्वबळावर सत्ता आहे. भाजपाचे त्या राज्यांत स्वत:चे मुख्यमंत्री आहेत. इतर चार राज्यांत अन्य पक्षांबरोबर वा आघाडी सरकारमध्ये भाजपा सत्तेत सहभागी आहे. काँग्रेसचे देशात आता तीन राज्यांत मुख्यमंत्री स्वबळावर आहेत. अन्य दोन राज्यांत काँग्रेस अन्य पक्षांबरोबर सत्तेत सहभागी आहे. सन २०१४ मध्ये केंद्रात नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपाचे सरकार स्थापन झाले, तेव्हा देशात ७ राज्यांत भाजपाची सत्ता होती. देशाच्या २५ टक्के लोकसंख्येवर भाजपाची हुकूमत होती. सन २०१८ मध्ये भाजपाची देशात २१ राज्यांत सत्ता होती. देशातील जवळपास ७१ टक्के लोकसंख्या भाजपाच्या सत्तेच्या छत्राखाली होती. नंतर झालेल्या निवडणुकीत भाजपाच्या हातून काही राज्ये निसटली. पण नरेंद्र मोदी यांचा करिष्मा व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची रणनिती व संघटन कौशल्य यातून पुन्हा भाजपाची घोडदौड सुरू झाली.

पाच राज्यांच्या निवडणूक निकालानंतर डिसेंबर २०२३ मध्ये देशात भाजपाचा दबदबा पुन्हा वाढला आहे. भाजपाने राजस्थान, मध्य प्रदेश व छत्तीसगडमध्ये मिळविलेल्या विजयानंतर भाजपाची सत्ता असलेल्या राज्यांची संख्या आता १६ झाली आहे. देशात उत्तर प्रदेश, उत्तराखंड, हरियाणा, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपुरा, आसाम, गोवा, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश व छत्तीसगड या १२ राज्यांत भाजपाची स्वबळावर सत्ता आहे, तर महाराष्ट्र, मेघालय, नागालँड व सिक्कीम या चार राज्यांत भाजपा सत्तेत सहभागी आहे. काँग्रेस पक्ष स्वबळावर कर्नाटक, हिमाचल प्रदेश व आता तेलंगणा या तीन राज्यांत सत्तेवर आहे. बिहार व झारखंड या दोन राज्यांत काँग्रेस तेथील आघाडी सरकारमध्ये सहभागी आहे. दक्षिण भारत व पूर्व भारत वगळला, तर अन्य प्रदेशात सर्वशक्तिमान पक्ष म्हणून भाजपाची प्रतिमा बनली आहे. ईशान्य भारतात सिक्कीमसह तेथील राज्यांत भाजपाचा विस्तार उत्तम आहे. ईशान्य भारतातील आठ राज्यांत एकूण ४९८ आमदार आहेत. त्यात भाजपाचे २०६ आमदार आहेत. ईशान्येतील राज्यातून एकूण २५ खासदार येतात. त्यात १५ खासदार भाजपाचे आहेत.

भारताच्या पश्चिम विभागात महाराष्ट्र, गुजरात व राजस्थान या राज्यांत भाजपाने आपला पाया भक्कम रोवला आहे. महाराष्ट्रात शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार) यांना बरोबर घेऊन भाजपा सत्तेत आहे. पण भाजपा हाच राज्यातील व सरकारमधील सर्वात मोठा पक्ष आहे. गुजरात तर हा अनेक वर्षांपासून भाजपाचा भक्कम किल्ला बनला आहे. या तीन राज्यांत मिळून एकूण ६७० आमदार आहेत. त्यात ३३१ आमदार भाजपाचे आहेत. ३ डिसेंबरला राजस्थानात मतमोजणी झाली. राजस्थानमध्ये भाजपाचे ११५ आमदार निवडून आले. साहजिकच या आकडेवारीत आणखी ४०ने भर पडली आहे. महाराष्ट्र, गुजरात व राजस्थान या तीन राज्यांत मिळून एकूण ९९ खासदार आहेत. त्यात ७३ खासदार हे भाजपाचे आहेत.

पूर्व भारतातील बिहार, पश्चिम बंगाल, झारखंड आणि ओडिसा या चारही राज्यांत भाजपा किंवा काँग्रेस या दोन्ही राष्ट्रीय पक्षांचा फारसा प्रभाव नाही. बिहारमध्ये नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखाली जनता दल यू, राजद, काँग्रेस यांचे महाआघाडी सरकार आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जींच्या नेतृत्वाखाली तृणमूल काँग्रेसचे, तर ओडिसामध्ये नवीन पटनाईक यांच्या नेतृत्वाखाली बीजू जनता दलाचे सरकार आहे. या चार राज्यांत एकूण आमदारांची संख्या ७२२ आहे. त्यात १९६ आमदार हे भारतीय जनता पक्षाचे आहेत. तसेच या चार प्रदेशांत मिळून ११७ खासदार आहेत, पैकी ५४ खासदार हे भाजपाचे आहेत.

उत्तर भारतातील दिल्ली, पंजाब, हरयाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेश या हिंदी भाषिक राज्यात भाजपाचे संघठन मजबूत आहे. उत्तर प्रदेश, हरयाणा व उत्तराखंड या तीन राज्यांत भाजपाचे सरकार आहे. दिल्ली-पंजाबमध्ये आम आदमी पक्षाचे सरकार आहे. हिमाचल प्रदेशात काँग्रेसचे सरकार आहे. या सर्व राज्यांत मिळून एकूण ८१८ आमदार आहेत. पैकी ३७७ आमदार हे भाजपाचे आहेत. या राज्यांतील खासदारांची संख्या १८९ आहे, पैकी ९८ खासदार हे भाजपाचे आहेत. मध्य भारतात छत्तीसगड व मध्य प्रदेश ही राज्ये येतात. आता दोन्ही राज्यांतील सत्ता भाजपाकडे आली आहे. या राज्यात एकूण ४२० आमदार आहेत. निवडणुकीपूर्वी या दोन्ही राज्यांत भाजपाच्या आमदारांची संख्या १४४ होती. मध्य प्रदेशात १६३, तर छत्तीसगडमध्ये ५५ आमदार भाजपाचे विजयी झाले. आमदारांच्या संख्येत ७०ची नव्याने भर पडली आहे. दोन्ही राज्यांत ४० खासदार आहेत, त्यात ३७ खासदार हे भाजपाचे आहेत.

दक्षिण भारतातील पाच राज्यांत भाजपाचे कुठेही सरकार नाही. दक्षिणेतील ५ राज्ये व एका केंद्रशासित प्रदेशातून १३० खासदार येतात, पैकी २९ खासदार भाजपाचे आहेत. त्यातलेही २५ खासदार हे कर्नाटकमधून व ४ खासदार तेलंगणातून आले आहेत. या वर्षी दोन्ही राज्यांतील सत्ता काँग्रेसकडे गेली आहे. दक्षिण भारतातील एकूण आमदारांची संख्या ९२३ आहे. त्यातले जेमतेम १० टक्के आमदार भाजपाचे आहेत. दक्षिणेकडील राज्यात भाजपाची सत्ता नाही हे वास्तव आहे. कर्नाटकमध्ये भाजपाने दक्षिणेचा दरवाजा उघडला होता, पण तेथे आज काँग्रेस सत्तेवर आहे. तेलगंणात भाजपाने आपले बस्तान बसविण्यासाठी अथक प्रयत्न केले. पाच वर्षांपूर्वी भाजपाचा तेथे एकच आमदार होता. यंदाच्या निवडणुकीत ८ आमदार विजयी झाले.

तेलंगणात भाजपाला मिळालेल्या मतांची टक्केवारी १३ वर पोहोचली आहे, हे सुद्धा फार मोठे यश आहे. काँग्रेसचा मुख्यमंत्री म्हणून ज्यांचे नाव आघाडीवर आहे, ते रेवण रेड्डी हे मूळचे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या मुशीतून तयार झाले आहेत. हिमाचल प्रदेश वगळता उत्तर भारतात कोणत्याही राज्यात काँग्रेसची सत्ता नाही. या निवडणुकीत राजस्थान व छत्तीसगड या राज्यातील सत्ता काँग्रेसने गमावली व या दोन्ही राज्यांवर भाजपाचा भगवा फडकला. निकालानंतर तेलंगणातील काँग्रेसच्या विजयापेक्षा मध्य प्रदेश, राजस्थान व छत्तीसगडमधील भाजपाच्या देदीप्यमान विजयाची चर्चा देशभर झाली. काँग्रेसच्या अनेक मंत्र्यांनी मध्य प्रदेशात दीडशेपेक्षा जास्त जागा मिळवू, असे भाकीत वर्तवले होते. प्रत्यक्षात भाजपाने १६३ जागा जिंकून काँग्रेसला धोबीपछाड केले. मध्य प्रदेशात भाजपाच्या झंजावातापुढे कमलनाथ यांचे नेतृत्व अगदीच कमी पडले. नरेंद्र मोदी-शिवराजसिंह यांनी निर्माण केलेल्या भाजपामय वातावरणात काँग्रेस शोधावी लागत होती.

छत्तीसगडमध्ये भूपेश बघेल व टी. एस. सिंहदेव यांच्या खेचाखेचीत काँग्रेसचे नुकसान झाले. राजस्थानमध्ये अशोक गेहलोत व सचिन पायलट यांच्यातील शीत संघर्षाचा पुरेपूर लाभ भाजपाने उठवला. या सर्वच राज्यांत काँग्रेसचे प्रभारी शोभेपुरते होते. काँग्रेसची देखरेख यंत्रणा कमकुवत होती. राहुल गांधींच्या भरवशावर निवडणूक जिंकता येत नाही, एवढा जरी बोध काँग्रेसने घेतला तरी खूप शिकले, असे म्हणावे लागेल. भाजपा विरोधातील इंडिया नामक दुकानाचे शटर हिंदी भाषिक राज्यांनी बंद केले हेच निकालानंतर बघायला मिळाले. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पनवतीमुळे भारतीय संघ विश्वचषक स्पर्धेत अंतिम सामन्यात पराभूत झाला, असे राहुल गांधींनी उद्गार काढले होते. त्यांनी केलेली वैयक्तिक व हिन दर्जाची टीका मतदारांना आवडली नाही. त्याचा वचपा मतदारांनी निवडणुकीत काढला. यापूर्वी मोदींना 'मौतका सैदागर' म्हटले, नंतर 'चौकीदार चौर है' अशी टवाळी केली. आता मोदींना 'पनवती' म्हणून संबोधून राहुल गांधींनी काँग्रेसच्या पायावर धोंडा पाडून घेतला.

तीन राज्यांतील भाजपाच्या विजयाने सन २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीची झलक दाखवली आहे. या निवडणुकींकडे सेमी फायनल म्हणून बघितले गेले. आता फायनलमध्ये विजय निश्चित आहे. २०२४ला नरेंद्र मोदी पंतप्रधानपदाची हॅटट्रिक करणार व केंद्रात पुन्हा भाजपाचे सरकार येणार हाच या निकालातून संदेश आहे. 'सपने नही हकिकत बुनते हैं, तभी तो सब मोदी को चुनते है'

**- डॉ. सुकृत खांडेकर**

# मराठी पाट्या आणि मराठी प्रेम

राज्यातील सर्व दुकानांवर मराठी पाट्या लावण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेली मुदत २५ नोव्हेंबरला संपली. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र दुकाने आणि आस्थापना (नोकरीचे आणि सेवाशर्तीचे विनियमन) सुधारणा अधिनियम २०२२च्या कलम ३६ 'क' (१) च्या कलम ६ अन्वये नोंदणी केलेल्या प्रत्येक दुकान-आस्थापनाला कलम ७ नुसार दुकानांवर मराठी भाषेतून ठळक अक्षरांत नामफलक लावणे बंधनकारक आहे. याबाबत मुंबई महापालिकेने गत कारवाई सुरू केली होती. मात्र व्यापारी संघटनांनी काहीनाकाही कारणे देत पालिकेकडून चारवेळा अवधीवाढ मागून घेतली. अखेर मराठी पाट्यांचे प्रकरण उच्च न्यायालयातून सर्वोच्च न्यायालयात गेल्यानंतर न्यायालयाने नोव्हेंबर २०२२ मध्ये कारवाईला स्थगिती दिली होती. त्यानंतर ऑक्टोबर २०२३ मध्ये न्यायालयाने व्यापारी संघटनेला दोन महिन्यांत मराठीत पाट्या लावण्याचे निर्देश दिले होते. ही मुदतही संपल्याने आता महापालिकेने रस्त्यावर उतरून कारवाईला आरंभ केला आहे. ज्या दुकानांवर देवनागरी लिपीत ठळक मराठीत पाटी नसेल त्या दुकानांवर न्यायालयाच्या निर्देशानुसार महापालिकेकडून कारवाई करण्यात येत आले. न्यायालयानेच हा निर्णय दिल्याने राज्यभरात याची अंमलबजावणी तातडीने होणे आवश्यक आहे; मात्र अनेक भागांत राजकीय पक्षांना आणि मराठीप्रेमी संघटनांना न्यायालयाच्या आदेशाच्या पूर्ततेसाठी आंदोलने करावी लागत आहेत हे दुर्दैवच म्हणावे लागेल.

ज्या राज्यात आपण राहतो आणि व्यवसाय करतो त्या राज्याच्या भाषेमध्ये दुकानावर पाटी असावी, असा साधा नियम असताना काही मूठभर व्यापाऱ्यांनी हे प्रकरण न्यायालयापर्यंत नेले. यावरूनच या व्यापाऱ्यांची मग्रुरी आणि मराठी भाषेविषयीचा आणि मराठी भाषिकांविषयीचा द्वेष लक्षात येतो. ज्या भाषिकांच्या जीवावर व्यवसाय करायचा, आपले घरदार चालवायचे, आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी धनाची सोय करायची त्याच भाषेचा सन्मान करण्याची वेळ येते, तेव्हा थेट न्यायालयात आव्हान द्यायचे हा कृतघ्नपणाच नव्हे काय ? अशाना जशास तसे उत्तर देण्याचीच आवश्यकता आहे. मराठी भाषेतील पाट्यांचा विषय सध्या ऐरणीवर असल्याने येत्या काही दिवसांत दुकानांवर मराठी पाट्या लागतील सुद्धा. मात्र मराठी माणसाने केवळ यावरच संतुष्ट राहून चालणार नाही.


मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा असल्याने तिचा सन्मान करणे, हे येथील प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, मग तो नागरिक कोणत्याही भाषेचा असेना. आजमितीला मुंबईसह राज्यातील प्रमुख शहरांतील मराठी टक्का घसरत चालला आहे. व्यवसायामध्ये परप्रांतीयांचा शिरकाव मोठ्या प्रमाणात झाला आहे. किराणा माल असो वा भांड्यांची, कपड्यांची, चपलांची दुकाने. सर्व ठिकाणी परप्रांतीय दुकानदारच मोठ्या प्रमाणात दिसतात. मुंबईत रिक्षा, टॅक्सी चालवनारेही बहुतांश परप्रांतीयाच आहेत. शिक्षण पूर्ण झाल्यावर चांगल्या वेतनाची नोकरी मिळवायची आणि नोकरीत पदोन्नती मिळवत राहायच्या एव्हढेच ध्येय आपल्यापैकी बहुतांश मराठी माणसे उराशी बाळगतात. 'व्यवसाय म्हणजे धोका', 'कर्ज काढून व्यवसाय चालला, तर ठीक, नाही चालला तर कर्ज कसे फेडायचे', 'मुलाबाळांना खायला कुठून द्यायचे' त्यापेक्षा ८ तासांची नोकरी करायची आणि उरलेला वेळ मनसोक्त जगायचे, एव्हढेच काय ते सर्वसामान्य मराठी माणसाचे रोजचे जीवन, आज आपल्या दृष्टीसमोर परप्रांतीय शहरात येतात, मेसमध्ये राहून, कोणाकडून तरी पैसे उसने घेऊन रस्त्यावर कुठेतरी कोपऱ्यात पाणीपुरी-, भेळपुरीचे छोटेसे विक्रीकेंद्र उभारतात. हळूहळू पैसा हाताशी येऊ लागला कि व्यवसाय मोठा करत जातात यातूनच कितीतरी मोठमोठे व्यावसायिक तयार झाले आहेत. मुंबईतील उच्चभ्रू वसाहतींमध्ये आलिशान इमारतींमध्ये आज ते रहात आहेत आणि आजही आपला मराठी तरुणवर्ग यांच्या हाताखाली ८ तास नोकरी करतो आहे. मराठी माणसांना हे जसे कमी लेखतात तसे आज मराठी भाषेलाही ते कमी लेखू लागले आहेत. आपले मराठी भाषेचे प्रेम केवळ मराठी भाषा दिनाला जागृत होते. सामाजिक माध्यमांतून आपण ते व्यक्तही करतो. एक दिवस मराठीचे गुणगान गातो, एका दिवसापुरते शुद्ध मराठीतून संवाद साधण्याचा प्रयत्न करतो. दुसऱ्या दिवशी तोच भाषाभिमान आपण खुंटीला टांगतो. खाद्यपदार्थ किंवा वस्तू खरेदी करताना, सार्वजनिक वाहनांतून प्रवास करताना दुकानदार, वाहनचालक अमराठी दिसला कि आपण आपला मराठी भाषाभिमान बाजूला ठेवून त्याच्याशी हिंदी भाषेत संवाद साधू लागतो. हिंदी भाषा परकीय नसली तरी समोरील व्यक्ती ही महाराष्ट्रात रोजगारासाठी बाहेरून आलेली आहे, त्यामुळे तिला येथील भाषा समजून घ्यायलाच हवी, तोडकी मोडकी का होईना मराठी बोलता यायलाच हवी हा अट्टाहास आपण का करत नाही ? सदर व्यक्तीला आपली गरज आहे त्यामुळे आपण सर्वच जण तिच्याशी मराठीत बोललो तर इथे रोजगार मिळवण्यासाठी मराठी यायलाच हवी याचा बोध तिलाही होईल आणि ती व्यक्तीही मराठी शिकू लागेल; मात्र आपणच जर तिच्याशी अन्य भाषेत बोलू लागलो तर तिला मराठीचे महत्व कळणार तरी कसे ? महाराष्ट्रात मराठीतच संवाद साधण्याची सवय प्रथम स्वतःला लावून घ्यावी लागणार आहे. शासकीय कार्यालयांत तसेच खासगी क्षेत्रांतही भरावयाचे अर्ज मराठीतच असण्याचा हट्ट धरायला हवा.



जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई
मो.९६६४५५९७८०

**क्रमशः**

## शब्दकोडे-२५४



**आडवे शब्द**

१. उन्हाळ्यात दिलासा देणारा पाऊस ३. चामखीळ ४. पराजय ७. कौसल्यापुत्र ९. कर्ज देणारा १०. नवरदेवाकडील मंडळी १२. पंख १३. कपडालत्ता १६. तापविणारा सूर्य १८. गुजराथी नृत्यप्रकार १९. झोपडी २०. भांडण २१. बारा स्वारांच्या अक्षरांची मालिका उदा.क, का, की, कि, कु, कू, इत्यादी २३. चप्पल २४. लवकर, वेगाने २६. ख्रिश्चन धर्माचे प्रमुख धर्मगुरु २७. बारा वर्षाचा काळ २९. कोर्टातील कथन ३०. गीत, नृत्य, वाद्य यांचा संगम ३२. नवरा (ग्रा.) ३५. रमणीय ३६. धुंदी ३८. ज्ञानेश्वरीत उल्लेखलेला एक पक्षी ४०. श्रीमंत ४१. एक क्षार ४२. रस काढण्याचे यंत्र ४४. चिंतन ४५. अंत:करण ४६. तेज ४८. मध्यभागी ५०. प्रत्येक दिवशी ५२. वांग्याचा खमंग पदार्थ ५३. गुरांचा समुदाय ५४. मऊ ५६. कौरव पांडवांची कथा ५८. पुरुष, शूर पुरुष ५९. समीक्षा ६२. मदनपत्नी ६३. कपटी ६८. एक पालेभाजी ६९. परमेश्वर ७०. चिंता ७२. मिठी ७३. एकदम पडलेला शेणाचा गोळा ७४. अजागळ ७६. आशीर्वाद ७९. एकत्रित रडणे ८०. सुगंध ८१. बारावी रास ८२. तानाजीला दिलेली पदवी, शूर पुरुष

**उभे शब्द**

१. व्यर्थ बडबड, चऱ्हाट २. लग्नासाठी जमलेले गणगोत ३. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेणारी संस्था (फक्त आद्याक्षरे) ३अ. फुरसत ४. पुन्हा पुन्हा ५. घर ६. आशीर्वाद ७. असुर ८. नामशेष ९. सर्प ११. दुसऱ्याकडे भोजन घेणे, व्रतकाळात हे पाप समजतात १२. अनुमती १४. वाढलेला व्याप १५. वही १७. सोंगट्यांचे वस्त्र १९. झीज, नुकसान २०. पोते २१. दावा २३. हेलपाटा २५. पृथ्वी २६. कुबड २८. घागरा ३०. एकत्र गोळा करणे, जमविणे ३१. श्रीविष्णूचे नावडते फूल ३३. दशमुखी रावण ३४. चाक ३७. एक हिंस्र पक्षी ३८. झोंबणारे ३९. लिहिलेले वाचणारा ४०. सन्मानाची रक्कम ४३. पंकज ४४. माझे ४५. इच्छा ४७. अभिप्राय ४९. हत्यारांची, सामानाची पिशवी बहुदा न्हाव्याकडील ५०. इटलीची राजधानी ५१. लोखंड (हिंदी) ५२. ओहोटीच्या विरुद्ध ५३. पाषणहृदयी ५५. रसदार ५६. दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा ५७. हिंदुस्थान ५८. मौज ६०. फणसाचा एक प्रकार ६१. नागपूरचे प्रसिद्ध फळ ६३. गाजावाजा ६४. तोटी ६६. खिडकीची काच ६७. यावर्षी ६८. नोकर ७१. आयुष्य ७५. पुरे! ७७. मादीच्या विरुद्ध ७८. धातूचा जाड-बारीक धागा

## शब्दकोडे-२५३ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.तडकाफडकी ५.पसंत ८.नांगर १०.मरवा १२.परवानगी १४.मळ १६.तडक १७.रांगणे १९.कणीक २०.समरांगण २१.अचानक २३.टमटम २६.कमाल २७.थाळी २९.दर ३०.कर ३२.कौरव ३३.चौक ३४.दोन ३५.पलायन ३७.स्याही ३९.थरकाप ४१.बाबत ४३.तजवीज ४५.नयन ४६.सर ४७.सणक ४९.व ५०.वाटप ५१.नजर ५२.डमरु ५४.भाव ५५.कयास ५७.काळीज ५८.दवा ६०.तार ६१.पोर ६२.स्तवनीय ६३.नवार ६४.विनायक ६८.गो ६९.मळकट ७१.कमळ ७४.पाकळी ७५.पसारा ७७.लवाद ७८.मसलत ७९.गजर ८०.नटराज ८१.कर्पूर

**उभे उत्तर**

१.तळतळाट २.कारक ३.डमडम ४.कीर ६.संपणे ७.तर ८.नांगी ९.रमणीय ११.वारांगना १३.वाटचाल १५.ठक १८.गण २०.सम २१.अमावस्या २२.कथाकथन २४.मदनबाण २५.टर २६.कर २८.आपपरभाव ३०.कला ३१.रयत ३५.पत ३६.नजरानजर ३८.हीनगंड ४०.कास ४२.बकवास ४४.जबरदस्त ४७.सरक ४८.उपकार ५३.मलय ५४.भारवाहक ५६.यातना ५९.वावटळ ६०.तान ६१.पोकळ ६४.विलाप ६५.यमराज ६६.सटवाई ६७.पंक ७०.कल ७२.मर्कट ७३.खास ७४.पातक ७६.साग ७८.मज

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

न्यूज कॉलम


### रॉडने मारहाण; एकाविरूद्ध गुन्हा

**दोंडाईचा ।** ऊसाच्या मशीनचे एक हजार रूपये दिले नाही म्हणून श्यामकांत रोहिदास पाटील (रा. विद्यानगर, दोंडाईचा) यास दिनेश माळी (रा. म्हाळसानगर, दोंडाईचा) याने शिवीगाळ करीत हाताबुक्क्यांनी मारहाण केली. लोखंडी रॉडने डोक्याच्या पुढील बाजूस मारून जखमी केले. तसेच श्यामकांत यांच्या गजानन टी सेंटर दुकानाचे नुकसान केले. हा प्रकार सोमवारी (ता. ४) दुपारी साडेबाराच्या सुमारास घडला. दिनेश कोळी याच्यावर गुन्हा दाखल झाला.

### अवकाळी नुकसानीचे पंचनामे करा!

**धुळे ।** तालुक्यातील बिलाडी येथे धुळे ते न्याहळोद रस्त्यावर घरासमोर खेळत असलेल्या गणेश जितेंद्र वैराळे (वय ८) या बालकाला दुचाकी (एमएच१८, बीएस ५६१२)ने धडक दिली. त्यात बालकाला जबर दुखापत झाली. १ डिसेंबरला सायंकाळी साडेपाचच्या सुमारास ही घटना घडली.

# धुळ्यात महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानवाला अभिवादन






**धुळे । प्रतिनिधी**

महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त विविध पक्ष, सामाजिक संघटना, पोलीस अधिकारी व असंख्य भीम अनुयायांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळ्याजवळ

सामुहिक बुध्दवंदनेसह विविध कार्यक्रम झाले.




महापरिनिर्वाणदिनानिमित्त सकाळपासूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळ्याजवळ भीम अनुयायांनी गर्दी करण्यास सुरवात केली होती. यावेळी हरिश्चंद्र लोंढे, प्रभाकर खंडारे, एस.यु.तायडे, एल.आर. राव, जिभाऊ खैरनार, बी.पी.अहिरे, पुंजू अहिरे आदींनी बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, उपजिल्हाप्रमुख किरण जोंधळे, महानगर प्रमुख डॉ. सुशील महाजन, उपमहानगरप्रमुख कैलास मराठे, विनोद जगताप,संतोष शर्मा, संजय जवराज, प्रवीण साळवे, प्रफुल पाटील, शिवसेनेच्या उपनेत्या शुभांगी पाटीलविवेक सूर्यवंशी, जसपालसिंग सिसोदिया, गोकुळ राजपूत, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, पोलीस निरीक्षक संजय सूर्यवंशी, भैय्या भालेराव, राज चव्हाण, योगेश जगताप उपस्थित होते.

## विद्याधन महाविद्यालयात महापरिनिर्वाणदिनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**धुळे । प्रतिनिधी**



शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे, विद्याधन महाविद्यालय वलवाडी, धुळे येथे ६७ वा महापरिनिर्वाण दिवस साजरा करण्यात आला.

याप्रसंगी म्हसदी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य यावर मार्गदर्शन केले., तसेच सोनगीर महाविद्यालयातील प्रा.डॉ. रवींद्र ढिवरे यांनी महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह बद्दल माहिती दिली. तसेच प्रा.डॉ. एस.एन.वाघ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय घटनेचे शिल्पकार कसे झाले याच्याबद्दल माहिती दिली. तसे अध्यक्ष भाषण प्राचार्य डॉ. आर. बी. पवार यांनी डॉ. बाबासाहेब यांच्या संघर्षमय जीवनाचा प्रवास कसा झाला याची माहिती दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉक्टर योगेश बोरसे यांनी केले. याप्रसंगी संस्थेचे सचिव श्री.हर्षल पाटील, म्हसदी महाविद्यालयाचे प्रा. विठ्ठल साळुंखे, एसएसव्हीपीएस महाविद्यालयाच्या प्रा. स्वाती नंदन, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. योगेश बोरसे राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रमाधिकारी प्रा. जागृती पाटील, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी प्रा. ललिता निकम, करियर कट्ट्याचे समन्वयक प्रा. भूषण पाटील, प्रा. गायत्री नवसारे, प्रा. वसुधा अहिरे महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षक तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## आदिवासींचा लाँग मार्च नागपूरच्या दिशेने रवाना

**नाशिक ।** शिंदखेड आदिवासींवर होणारे अन्याय अत्याचार, बोगसांची घुसखोरी आदी आदिवासींच्या प्रश्नावर सरकारला जाग आणण्यासाठी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे राष्ट्रीय युवा अध्यक्ष लकी जाधव यांच्या नेतृत्वाखाली नागपूर हिवाळी अधिवेशनावर आदिवासींचा उलगुलान लाँग मार्च सिन्नर येथून मंगळवारी (दि. ५) नागपूरच्या दिशेने रवाना झाला. सोमवारी हा मार्च (दि. ११) हिवाळी अधिवेशनावर धडकणार आहे. धनगर अथवा कोणत्याही जातीचा आदिवासी जमातीत समावेश करू नये, सुधाकर शिंदे समिती रद्द करावी, धनगर जात व आदिवासी जमातीचे सर्वेक्षण करून टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसने (टीआयएसएस) राज्य शासनाला अहवाल सादर केलेला आहे तो हिवाळी अधिवेशनात जाहीर करून जनतेसमोर आणावा यांसह विविध मागण्यांसाठी हा उलगुलान लाँग मार्च काढण्यात आला आहे.

## विसपूते विद्यालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**धुळे । प्रतिनिधी**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे महापुरुष हे विशिष्ट समाजाचे नसतात तर ते अखील जगाच्या प्रगतीचे दिशादर्शक असतात. म्हणून अशा महापुरुषांचे विचार शालेय जीवनात विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक ठरतात. आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बापूसाहेब डी. डी. विसपूते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आज ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य श्री पी. बी. पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. व्यासपीठावर श्री एस. आर. पाटील, श्री डी. डी. पवार, श्री ए. के. पाटील, श्री एस. बी. भदाणे उपस्थित होते. विद्यालयाचे उपशिक्षक श्री ए. के. पाटील यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन परिचय देऊन त्यांच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री विजय देसले, श्रीमती अपर्णा पाटील, श्री महेंद्र बाविस्कर, श्री योगेंद्र पाटील, श्री महेश पाटील, श्रीमती राजश्री मासूळे, श्री जयेश गाळणकर, श्री कुणाल साळुंखे, श्री तुषार कुलकर्णी, श्री अभिज्ञ पवार, श्री विलास भामरे व महेश पवार यांनी मेहनत घेतली.




## जेष्ठ विधीज्ञ शामकांत आर. पाटील जीवन गौरव पुरस्काराने सन्मानीत

### सर्वोच्च न्यायालयाचे न्यायामुर्ती अभय ओक यांच्या हस्ते सन्मान

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे जिल्हा वकील संघाचे जेष्ठ सदस्य माजी जिल्हा सरकारी वकील, तसेच सनी साळवे खून खटल्यातील विशेष सरकारी वकील ॲड.शामकांत पाटील यांचा बार कॉन्सील ऑफ महाराष्ट्र व गोवा तर्फे कोल्हापूर येथे वकील दिनाच्या निमित्ताने जिवन गौरव पुरस्कार मा. न्यायामुर्ती अभय ओक सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांच्या हस्ते देण्यात आला. अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ॲड.शामकांत पाटील यांचा सामाजिक, राजकीय,शैक्षणिक, व वकिली क्षेत्रातून संपूर्ण वकील वर्ग,जेष्ठ विधिज्ञ,धुळे जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष व पदाधिकारी व कार्यकारणी सदस्य तसेच संपूर्ण महाराष्ट्रातील मित्र परिवाराकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## चारचाकी वाहनांचे सायलेंसर चोरले

**नाशिक ।** शहरातील विविध भागांमध्ये घडलेल्या वेगवेगळ्या घटनांमध्ये चोरट्यांनी तीन वाहनांचे सायलेंसर चोरले. आडगाव नाका, पखाल रोड आणि नाशिक रोड येथील आनंदनगर भागात हे प्रकार घडले. विक्रांत गौतम जाधव यांनी पंचवटी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, २५ ते २७ नोव्हेंबरदरम्यान त्यांच्या कारचे ३० हजार रुपये किमतीचे सायलेंसर चोरीस गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. ४० हजार रुपयांचे सायलेंसर ३ ते ४ डिसेंबरदरम्यान चोरीला गेले आहे.

## शिरपूर येथे सामूहिक वंदनेतून महामानवास विनम्र अभिवादन

**शिरपूर । प्रतिनिधी**



शिरपूर येथे सामूहिक वंदनेतून महामानवास विनम्र अभिवादन करण्यात आले.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त शिरपूर येथील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यान व कृषी उत्पन्न बाजार समिती शिरपूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या प्रांगणात सर्व प्रथम आमदार काशिराम दादा पावरा यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर पोलीस निरीक्षक अंसाराम आगरकर, शिरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती के.डी. पाटील, माजी नगरसेवक गणेश सावळे, माजी नगरसेवक पिंटु शिरसाठ, किरण कढरे, माजी नगरसेवक बाबू खैरनार, माजी नगरसेवक बापू थोरात, सुरेश अहिरे, अशोक ढिवरे, रमेश वानखेडे, ड.युवराज ठोंबरे, प्रताप सरदार, बापुसाहेब ईंदासे, बन्सीलाल शिरसाट यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार परमपूज्य. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना उपस्थित माल्यार्पण करण्यात आले व सामूहिक धम्मवंदना ग्रहण करण्यात आली.

सुनील बैसाणे यांनी भूमिका मांडली. या प्रसंगी प्रा.मुनेश्र्वर, डॉ. नितीन निकम, सोनाली पवार, मारुती वाल्हे, भटू पवार, प्रताप देवरे, लोटन खैरनार, शौकीन कुवर, ड. योगेश शिरसाट, अनील आखाडे, राहुल पवार, मूलचंद शिरसाट, कपिल मोरे, प्रविण शिरसाट, राहुल पवार, नितीन मंगळे, हिम्मत सैंदाणे, पनिराज बैसाणे, दिनेश सावळे, ज्ञानेश्र्वर निकुंभे, विजयानंद शिरसाट, अनिल महिरराव, हिम्मत शिरसाट, जितेंद्र भदाने, लोटन थोरात, विक्की ढिवरे, विजयानंद शिरसाट, नागसेन पानपाटिल, राजवर्धन पवार, अमर वाघ, खंडु महिरे, सर्व स्तरातील प्रबुद्ध नागरिक स्वयंप्रेरणेने उपस्थित होते.

## कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**धुळे ।** तालुक्यातील देशशिरवाडे गावानजीक भरधाव कारच्या धडकेत दुचाकीवरील तरुण ठार झाला, तर एकजण गंभीर जखमी झाला.

३ डिसेंबरला हा अपघात झाला. सचिन दिलीप भामरे (वय २४) असे मृताचे आणि देवासी युवराज पाटील (वय ३२ रा. उमरे ता. साक्री) असे जखमीचे नाव आहे. दोघे ३ डिसेंबरला दुचाकी (एमएच १५, डीक्यू ९४३३)ने जात होते. त्यादरम्यान त्यांना देशशिरवाडे गावाजवळ एका पत्राच्या शेडसमोर समोरून भरधाव येणाऱ्या स्वीप्ट कारने जोरदार धडक दिली. त्यात गंभीर जखमी होऊन सचिन भामरे याचा मृत्यू झाला. तर मागे बसलेला देवासी पाटील गंभीर जखमी झाला. संजय देवरे यांच्या फिर्यादीवरून पिंपळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.



## साक्री शहरातील प्रभाग दोन मध्ये भुमीगत गटारी करा

### नागरिकांची मागणी

**साक्री । प्रतिनिधी**


येथील शहर अंतर्गत कर्मवीर नगर प्रभाग दोन मधील नांद्रे शॉपिंग सेंटर, आनंद नगर ते मनोहर सोनवणे कर्मवीर नगर ते भिलाटी पर्यंतचे गटारीचे काम सदर गटार सिमेंट पाईप द्वारे भुमीगत करण्यात यावे अशी मागणी कर्मवीर नगर येथील नागरिकांनी केली.

साक्री प्रभाग दोन मधील भूमिगत गटार सिमेंट पाईप द्वारे बंदिस्त काम करण्यात यावे अशी मागणी अनेक वर्षापासून आहे. ज्या ओपन गटारी आहेत त्या बऱ्याच ठिकाणी नादुरुस्त झाल्या आहेत गटारीचे पाणी वाहू शकत नाही जागोजागी गटार बंद झाली आहे. गटारीचे पाणी उघड्यावर वाहते आरोग्य वर्धेनी उपकेंद्र साक्री व पशुवैद्यकीय दवाखाना साक्री या ठिकाणी कर्मवीर नगर, परिसरातील गटारीचे पाणी खुले सोडून देण्यात आले आहे. दगड,विटा, माती, सांड पाणी रस्त्यावर येऊन रस्त्यावर रहदारीला अडथळा ठरत आहे. सातत्याने अपघात होत राहतात. झालेले अतिक्रमण हटवून रस्ता खुला करावा अशी मागणी जोर धरत आहे. यावेळी सयाजी अहिरराव, सुभाष बेडसे, विश्र्वास भदाणे, अमृत सोनवणे, सी.एस.महाले, राजेंद्र सोनवणे, क्रांती साळुंखे, नितीन सोनवणे, अक्षय सोनवणे, प्रमिलाबाई देसले, राजेंद्र दैवज्ञ, हेमंत आहिरराव, कपिल बेडसे, जे.जे.बोरसे, दिगंबर नांद्रे, रमेश भामरे आदी परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## कांद्याचे नुकसान ४४ हजार हेक्टरवर: समितीची पाहणी १० हजार हेक्टरचा, महिन्यात दुसऱ्यांदा दौरा

**नाशिक । प्रतिनिधी**

**गारपिटीने नाशिक विभागात तब्बल ४४ हजार २४० हेक्टरवरील भात, द्राक्ष, कांदा, कापूस, ऊस या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. परंतु, दरवेळी दरवाढीने फक्त कांदा अडचणीत आणतो म्हणून धसका घेतलेल्या केंद्राने सोमवारी अचानक समितीला पाहणी दौऱ्यासाठी धाडले. कृषी अधिकाऱ्यांचीही धावपळ उडाली.**



**पाहणी केंद्राचा खर्च स्थानिक अधिकाऱ्यांच्या माथी**

**केंद्रीय समिती पाहणीसाठी आल्यानंतर त्यांचे राहणे, जेवण, वाहतुकीचा सर्व खर्च हा स्थानिक अधिकाऱ्यांच्या माथी मारला जातो. त्यामुळे एका अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर समितीवर टीका केली.**

दोन दिवसांत ती फक्त कांद्याच्या १० हजार ६७३ हेक्टरवरील नुकसानीची पाहणी करणार आहे.

ऐनवेळी आलेल्या केंद्रातील पाहुण्यांमुळे कृषी अधिकाऱ्यांचीही धावपळ उडाली.समिती महिन्यात दुसऱ्यांदा दौऱ्यावर आली असून आधी दरवाढीमुळे तर यावेळी कांद्याचे क्षेत्रच घसरणार असल्याने पुन्हा भाव वाढीच्या चिंतेने पाहणी होणार आहे.

दरम्यान, समितीच्या पाहणीनंतर शेतकऱ्यांचे नुकसान होते हा दरवेळीचा अनुभव असल्याने त्यांनी या दौऱ्याबाबत बोटे मोडली.निफाड तालुक्यातील कोठुरे, बोकडदरे, चांदवड तालुक्यातील वाकी खुर्द, तळेगावरोही, कातरणी तसेच येवला येथील कांदा नुकसानीची समितीने पाहणी केली. मंगळवारी (दि.५) ही समिती विभागातील पाचही जिल्ह्यांतील कांदा नुकसानीचा ऑनलाइन आढावा घेणार आहे. समितीत मिशन फॉर इंटिग्रेटेड डेव्हलप ऑफ हार्टिकल्चरचे उपसचिव मनोज, डिपार्टमेंट ऑफ ॲग्रीकल्चर ॲण्ड फार्मर्स वेल्फेअरचे उपसंचालक पंकज कुमार, बी. के. पृष्टी यांच्यासह चार जण असून ते पाहणीनंतर केंद्राला अहवाल सादर करणार आहेत. पाहणी केंद्राची, खर्च स्थानिक अधिकाऱ्यांच्या माथीकेंद्रीय समिती पाहणीसाठी आल्यानंतर त्यांचे राहणे, जेवण, वाहतुकीचा सर्व खर्च हा स्थानिक अधिकाऱ्यांच्या माथी मारला जातो. त्यामुळे एका अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर समितीवर टीका केली.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# देवभाने येथे विकसित संकल्प यात्रा संपन्न

## शेतकऱ्यांना दिले ड्रोनद्वारे फवारणीचे प्रात्यक्षिक





















धुळे ।
विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावी या उद्देशाने शहरी व ग्रामीण भागात विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार आज धुळे तालुक्यातील देवभाने या ग्रामपंचायतीमध्ये विकसित भारत संकल्प यात्रा उत्साहान संपन्न झाली. यावेळी देवभाने गावाचे सरपंच संजय देसले, संपर्क अधिकारी श्रीमती. भारती भामरे, कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. पंकज पाटील, डॉ. धनराज चौधरी, आरोग्य विभागाचे डॉ.बी.आय.चव्हाण,ग्रामसेवक विशाल अकलाडे,कृषी सहायक रीना देवरे, जिजाबाई झाल्टे, डी.डी.सी. बँकेचे विश्र्वास पाटील, उमाकांत पाटील, व इतर सर्व विभागाचे प्रमुख तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ.पंकज पाटील यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीकडे वाटचाल करत शेतीच्या उत्पादनात वाढ कसे होईल यासाठी कृषी यांत्रिकीकरण सोबतच शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन कृषी क्षेत्रातील मजुरीच्या समस्यांवर मात करता येणार आहे. यासाठी केंद्र शासनाने अत्याधुनिक ड्रोनद्वारे फवारणी तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक प्रत्येक गावात केले जात असल्याचे सांगितले.

CMYK

दैनिक

लक्ष महाराष्ट्र

धुळे-नंदुरबार-नाशिक





# धुळ्यात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



















धुळे।

महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त विविध पक्ष, सामाजिक संघटना, पोलीस अधिकारी व असंख्य भीम अनुयायांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळ्याजवळ सामुहिक बुध्दवंदनेसह विविध कार्यक्रम झाले. महापरिनिर्वाणदिनानिमित्त सकाळपासूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळ्याजवळ भीम अनुयायांनी गर्दी करण्यास सुरवात केली होती. यावेळी हरिश्चंद्र लोंढे, प्रभाकर खंडारे, एस.यु.तायडे, एल.आर. राव, जिभाऊ खैरनार, बी.पी.अहिरे, पुंजू अहिरे आदींनी बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, उपजिल्हाप्रमुख किरण जोंधळे, महानगर प्रमुख डॉ. सुशील महाजन, उपमहानगरप्रमुख कैलास मराठे, विनोद जगताप,संतोष शर्मा, संजय जवराज, प्रवीण साळवे, प्रफुल पाटील, शिवसेनेच्या उपनेत्या शुभांगी पाटीलविवेक सूर्यवंशी, जसपालसिंग सिसोदिया, गोकुळ राजपूत, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, पोलीस निरीक्षक संजय सूर्यवंशी, भैय्या भालेराव, राज चव्हाण, योगेश जगताप उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ